
21. रूदरफोर्डच्या सुवर्णपत्री प्रयोगाचे एक निरीक्षण. "काही $\alpha$-कणांचे काही कोनांतून विचलन झाले" ह्याचे कारण $\alpha$-कण

अ. अणुकेंद्रकाच्या जवळ आले.

ब. इलेक्ट्रॉन्स् कडे आकर्षित झाले.

क. इलेक्ट्रॉन्स्वर आढळले.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहे/आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ (2) फक्त ब

(3) फक्त क (4) ब आणि क

One of the observations of Rutherford's thin gold foil experiment was "some $\alpha$-particles got deflected by some angle". The reason was $\alpha$-particles

a. came closer to the nucleus.

b. were attracted towards electrons.

c. collided with the electrons.

The correct option/s is are

**Answer Options :**

(1) Only a (2) Only b

(3) Only c (4) b and c

---

22. रुदरफोर्डच्या प्रयोगाचे कोणते निरिक्षण प्लम पुडिंग प्रतिकृती वापरुन समजणे. शास्त्रिय दृष्टया अशक्य आहे ?

अ. बहुसंख्य $\alpha$-कण हे सुवर्णपत्रीतून सरळ आरपार गेले.

ब. काही $\alpha$-कणांचे काही कोनांतून विचलन झाले.

क. फारच थोडे $\alpha$-कण सुवर्णापत्रीवर आढळून परत स्त्रोताच्या दिशेने उलट फिरले.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ (2) फक्त ब

(3) फक्त क (4) अ, ब आणि क

Which of the following observations of Rutherford's experiment is impossible to understand scientifically with the plum pudding model ?

a. Most of the $\alpha$-particles passed straight through the thin gold foil.

b. Some of the $\alpha$-particles got deflected by some angle.

c. A very few $\alpha$-particles bounced back towards the source.

**Answer Options :**

(1) Only a (2) Only b

(3) Only c (4) a, b and c

**23.** शास्त्रीय तर्कानुसार. खालीलपैकी कोणती विधाने अचुक असतील.

अ. अणुपेक्षा त्याच्या कटायनचे आकारमान कमी असते.

ब. अणुपेक्षा त्याच्या अनामनचे आकारमान कमी असते.

क. अणुपेक्षा त्याच्या कटायनचे आकारमान जास्त असते.

ड. अणुपेक्षा त्याच्या अनायनचे आकारमान जास्त असते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ आणि ब (2) क आणि ड

(3) अ आणि ड (4) वरीलपैकी कोणते ही नाही

Using the scientific logic, predict which of the following statement/s are correct ?

a. size of the cation is smaller than the corresponding atom

b. size of the anion is smaller than the corresponding atom

c. size of the cation is bigger than the corresponding atom

d. size of the anion is bigger than the corresponding atom

**Answer Options :**

(1) a and b (2) c and d

(3) a and d (4) None of the above

---

**24.** $_{16}S^{32}$ ह्या अणुमध्ये, 'M' कवचात ________ इलेक्ट्रॉन असतात.

(1) 2

(2) 6

(3) 8

(4) 16

The number of electrons present in the 'M' shell of $_{16}S^{32}$ atom is ________

(1) 2

(2) 6

(3) 8

(4) 16

**25.** 'अ' गटातील घटकांना 'ब' गटात एकापेक्षा जास्त बरोबर पर्याय उपलब्ध असु शकतात.

| | *'अ' गट* | | *'ब' गट* |
|---|---|---|---|
| I. | 10 इलेक्ट्रॉन्स् | अ. | $^{20}_{10}Ne$ |
| II. | 12 प्रोटॉन्स् | ब. | $^{23}_{11}Na^{\oplus}$ |
| III. | 12 न्युट्रॉन्स् | क. | $^{19}_{9}F^{\ominus}$ |
| IV. | 10 न्युट्रॉन्स् | ड. | $^{24}_{12}Mg^{2\oplus}$ |

**पर्याय उत्तरे :**

(1) I अ
II ड
III ब, ड
IV अ, क

(2) I अ, क,
II ड
III ब, ड
IV अ

(3) I अ, ब, क, ड
II ड
III ब, ड
IV अ, क

(4) I अ, ब, ड
II ड
III ब
IV अ, ब, क

You may have more than one correct match in Group 'B' for each item in Group 'A'.

| | *Group A* | | *Group B* |
|---|---|---|---|
| I. | 10 electrons | a. | $^{20}_{10}Ne$ |
| II. | 12 protons | b. | $^{23}_{11}Na^{\oplus}$ |
| III. | 12 neutrons | c. | $^{19}_{9}F^{\ominus}$ |
| IV. | 10 neutrons | d. | $^{24}_{12}Mg^{2\oplus}$ |

**Answer Options :**

(1) I a
II d
III b, d
IV a, c

(2) I a, c
II d
III b, d
IV a

(3) I a, b, c, d
II d
III b, d
IV a, c

(4) I a, b, d
II d
III b
IV a, b, c

**पुढील उताराावाचून त्यावर आधारित 26 ते 30 प्रश्नांची उत्तरे द्या :**

एक पक्षीय वर्चस्वाचा प्रत्यय येणारा भारत हा एकमेव देश नाही जर आपण विश्वाकडे दृष्टि टाकल्यास आपल्याला एक पक्षीय वर्चस्वाची इतर बरीच उदाहरणे सापडतील. परंतू भारतातील वर्चस्व आणि इतर देशातील वर्चस्वामध्ये महत्त्वपूर्ण फरक दिसतो. लोकशाही तडजोडी साठी एक पक्षीय वर्चस्वाची खात्री इतर देशात दिसून येते. काही देशांमध्ये जसे, चीन, क्यूबा आणि सिरीया मध्ये संविधानाने फक्त एका पक्षाला संपूर्ण देशावर शासन करण्याची परवानगी दिली आहे. काही इतर देशामध्ये जसे म्यानमार, बेलारूस, इजिप्त आणि इरिट्रियामध्ये कायदेशीर आणि लष्करी उपायांमुळे एक पक्षीय राज्य प्रभावीपणे दिसून येते. काही वर्षापूर्वी पर्यंत मेक्सिको, दक्षिण कोरीया, तैवान ही एकपक्षीय वर्चस्व असणारी राज्य होती. भारतातील कांग्रेस पक्षाचे वर्चस्व हे इतर देशांपेक्षा भिन्न होते कारण ते लोकतंत्रात्मक वातावरणात प्राप्त झाले. मुक्त आणि निष्पक्ष वातावरणातील निवडणूंकामध्ये अनेक राजकीय पक्ष सहभागी होवून लढले. निवडणूका मागून निवडणूका जिंकण्यात कांग्रेस पक्ष यशस्वी झाला. वर्णभेदाच्या अंतानंतर दक्षिण अफ्रिकेत अफ्रीकन नॅशनल कांग्रेसला जे वर्चस्व प्राप्त झाले, त्याच्याशी याची साम्यता होती.

काही वर्षापूर्वी कांग्रेस नेतृत्त्व आणि विरोधी पक्षीय नेतृत्त्व यांच्यामध्ये मोठया प्रमाणावर एकमेकाप्रती सन्मान होता. स्वातंत्र्याच्या घोषणेनंतर आणि प्रथम सार्वत्रिक निवडणूकीनंतर शासन करणाऱ्या अंतरिम सरकारामध्ये डॉ. आंबेडकर आणि शामाप्रसाद मुखर्जी सारख्या विरोधी नेत्यांचा कॅबिनेट मध्ये समावेश होता.

**Read the following passage and answer the questions from 26 to 30 :**

India is not the only country to have experienced the dominance of one party. If we look around the world, we find many other examples of one party dominance. But there is a crucial difference between these and the Indian experience. In the rest of the cases dominance of one party was ensured by compromising democracy. In some countries like China, Cuba and Syria, the constitution permits a single party to rule the country. Some others like Myanmar, Belarus, Egypt and Eritrea are effectively one party states due to legal and military measures. Until a few years ago, Mexico, South Korea and Taiwan were also effectively one party dominant states. What distinguished the dominance of the Congress Party in India from all these cases was it happened under democratic conditions. Many parties contested elections in conditions of free and fair elections and yet the Congress managed to win election after election. This was similar to the dominance that the African National Congress has enjoyed in South Africa after the end of apartheid.

In the early years there was a lot of mutual respect between the leaders of the Congress and those of the opposition. The interim government that ruled the country after the declaration of Independence and first general election includes opposition leaders like Dr. Ambedkar and Shyamaprasad Mukherjee in the Cabinet.

**26.** काँग्रेस पक्षाच्या वर्चस्वाची कारणे कोणती आहेत ?

अ. राष्ट्रीय चळवळीचे वारसदार
ब. सर्वसमावेशक स्वरूप
क. उत्कृष्ट संघटीत पक्ष
ड. क्रांतीकारी नेतृत्त्व
इ. पैसा आणि माध्यमे

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ, ब, क (2) फक्त क, ड, इ (3) फक्त अ, क, इ (4) फक्त ब, ड, इ

What are the reasons for the dominance of Congress Party ?

a. As inheritor of national movement
b. All inclusive nature
c. Excellent organised party
d. Revolutionary Leadership
e. Money and Media

**Answer Options :**

(1) Only a, b, c (2) Only c, d, e (3) Only a, c, e (4) Only b, d, e

---

**27.** वरील उतारा कोणत्या राजकीय पक्षाशी संबंधित आहे ?

(1) काँग्रेस (आय)
(2) काँग्रेस (ओ)
(3) काँग्रेस (आर)
(4) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस

Which political party is related to the above passage ?

(1) Congress (I)
(2) Congress (O)
(3) Congress (R)
(4) Indian National Congress

---

**28.** योग्य कथन/कथने ओळखा :

अ. संविधानाद्वारे परवानगी प्राप्त एकल राजकीय पक्ष असणारे देश चीन आणि क्युबा आहेत.
ब. लष्करी कारणांच्या आधारे एक पक्ष असणारे देश इजिप्त आणि इरिट्रिआ आहेत.
क. लोकशाही वातावरणामध्ये एक राजकीय पक्षीय वर्चस्व असणारे देश भारत आणि दक्षिण अफ्रिका आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ, ब
(2) फक्त अ, क
(3) फक्त ब, क
(4) वरील सर्व

Select the correct statement/statements :

a. Constitution permitted single political party countries are China and Cuba.
b. On the basis of military reasons, the one party states are Egypt and Eritrea.
c. Under democratic conditions, single dominated political party countries are India and South Africa.

**Answer Options :**

(1) Only a, b
(2) Only a, c
(3) Only b, c
(4) All of the above

**29.** डॉ. भिमराव आंबेडकर आणि शामाप्रसाद मुखर्जी हे कोणत्या विरोधी पक्षाचे नेते होते ?

(1) डॉ. आंबेडकर – समाजवादी पार्टी
शामाप्रसाद मुखर्जी – भारतीय जनसंघ

(2) डॉ. आंबेडकर – शेड्यूल कास्ट फेडरेशन
शामाप्रसाद मुखर्जी – भारतीय जनता पार्टी

(3) डॉ. आंबेडकर – स्वतंत्र मजूर पक्ष
शामाप्रसाद मुखर्जी – हिंदू महासभा

(4) वरीलपैकी नाही

Dr. Bhimrao Ambedkar and Shyamaprasad Mukherjee were leaders of which opposition parties ?

(1) Dr. Ambedkar – Socialist Party
Shyamaprasad Mukherjee – Bharatiya Jansangh

(2) Dr. Ambedkar – Scheduled Caste Federation
Shyamaprasad Mukherjee – Bharatiya Janta Party

(3) Dr. Ambedkar – Independent Labour Party
Shyamaprasad Mukherjee – Hindu Mahasabha

(4) None of the above

---

**30.** वरील उताऱ्यानुसार एक पक्षीय वर्चस्वाची कारणे कोणती आहेत ?

अ. संविधानिक तरतुदी

ब. लष्करी उठाव

क. साम्यवादी राजवट

ड. लोकशाहीचे अपयश

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ, ब, क (2) फक्त अ, ब, ड

(3) फक्त अ, क, ड (4) फक्त ब, क, ड

What are the reasons of one party dominance, according to the above passage ?

a. Constitutional Provisions

b. Military Revolt

c. Communist Regime

d. Failure of Democracy

**Answer Options :**

(1) Only a, b, c (2) Only a, b, d

(3) Only a, c, d (4) Only b, c, d

---

**पुढील उतारावाचून त्यावर आधारित 31 ते 35 प्रश्नांची उत्तरे द्या :**

मिठाचा कायदा मोडण्याचा कार्यक्रम सबंध मे महिन्यात राबविल्यानंतर काँग्रेस कार्यकर्त्यांनी जंगलाविषीचे कायदे मोडण्याची मोहीम हाती घेतली. ग्रामीण भागातील माणसांना जगण्यासाठी जमीन, जनावर आणि जंगल या तीन गोष्टींची गरज असते. इंग्रजी राजवटीत 1866 नंतर जंगलांबाबत अनेक निर्बंध लादले गेले. आरक्षित जंगलांत गुरे चारण्यास, गवत व झाडे तोडण्यास मनाई करण्यात आली. त्यामुळे आदिवासींना जळणासाठी लाकूडफाटा, फळे, वनस्पती वनसंरक्षकाची नजर चुकवून गोळा कराव्या लागत. जंगलासंबंधीच्या कायद्यातील जाचक तरतुदींबद्दलचा असंतोष लक्षात घेऊन मिठाच्या कायद्याप्रमाणेच जंगलांसंबंधीचे कायदे मोडून सत्याग्रह मोहिमेची व्याप्ती 1930 च्या जुलैपासून वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर व अकोले हे तालुके ही चळवळ करण्यास अनुकूल क्षेत्र ठरतील असे जंगल सत्याग्रह समितीला वाटले आणि तिचे मुख्य कार्यालय संगमनेरला उघडण्यात आले. रामकृष्णदास महाराज, लालजी पेंडसे आणि श्रीपाद शंकर नवरे हे तिघे या सत्याग्रहाचे सूत्रधार होते. सागराकडून आता पर्वताकडे आपण जात असल्याचे नवरे यांनी पत्रक काढून जाहीर केले. या सत्याग्रहात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्रीनिवास सरदेसाई, भाई सट्टा यांनीही भाग घेतला आणि कारावास भोगला. 22 जुलै 1930 रोजी संगमनेर आणि अकोले तालुक्यात आषाढी एकादशीच्या दिवशी एकाच वेळी 20 – 22 ठिकाणी सत्याग्रह करण्यात आला. कोपरगाव आणि राहुरी तालुक्यातही जंगल सत्याग्रहाचे लोण पसरले होते. कायदेभंग करणाऱ्यांना अटक करण्यासाठी पोलीस गेले, तर हजारो लोक त्यांना प्रतिबंध करत असल्याचे अनोखे दृश्य चंदनपुरी व सावरगाव या खेड्यांत दिसले.

नाशिक जिल्ह्यात सटाणा, बागलाण, कळवण तालुक्यात जंगल सत्याग्रह जोरात होता. दादासाहेब गद्रे, महंत सीतारामशास्त्री आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे बागलाणातील सत्याग्रहाचे प्रमुख नेते होते. डांग हा तर जंगलांचा प्रदेश. तेथील कोळी व ठाकर हे आदिवासीही जंगल सत्याग्रहात ओढले गेले. वनचराईसाठी लादलेला कर त्यांच्याकडून वसूल करणे सरकारी नोकरांना अवघड होऊ लागले. सशस्त्र पोलिसांचाही त्यांना धाक वाटेनासा झाला. 5 ऑगस्टला बागलाणातील भिलवड येथे जंगल सत्याग्रह करण्यात आला तेव्हा त्यात हजारो शेतकरी सहभागी झाले होते. मिठाचा कायदा आणि जंगलाबद्दलचा कायदा मोडण्याच्या कार्यक्रमामुळे आधीच जागतिक महामंदीच्या लाटेमुळे गांजलेल्या शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर सत्याग्रह आंदोलनात जसा भाग घेतला, तसा आधीच्या चळवळीत कधीही घेतला नव्हता.

**Read the following passage and answer the questions from 31 to 35 :**

After implementing the programme of breaking the Salt Tax Law all through the month of May, Congress workers undertook the programme of breaking the Forest Laws. People in the rural areas need three things for livelihood — Land, Cattle and Forest. Under the British rule, a number of restrictions were imposed after 1866 on the use of forest. Grazing cattle, cutting of grass and trees was forbidden in the protected forests. Consequently, firewood, fruit, herbs could be collected by the tribal people only by deceiving the forest guards. Considering the unrest about the stringent Forest Laws, it was decided that from July 1930 onwards the programme of Satyagraha would be expanded beyond the breaking of Salt Tax Laws to breaking the Forest Laws. The Jungle Satyagraha Committee felt that Sangamner and Akole Taluqas of the Ahmednagar district would be favourable areas for this movement and hence, its main office was opened at Sangamner. The three leaders of this Satyagraha were Ramkrishnadas Maharaj, Lalji Pendse and Shripad Shankar Navare. Navare published a pamphlet declaring that they were now moving from the Sea to the Mountain. Tarkateertha Laxmanshastri Joshi, Shreeniwas Sardesai and Bhai Sattha also participated and were jailed in this Satyagraha. On 22$^{nd}$ July 1930, on the day of Ashadhi Ekadashi, Satyagraha was organised in Sangamner and Akole Taluqa simultaneously at about 20 – 22 places. The Forest Satyagraha had reached the Taluqas of Kopargaon and Rahuri as well. It was a sight to behold when the police reached the villages of Chandanpuri and Savargaon to arrest those who broke the Law — thousands of people had gathered to oppose them.

In Nasik District, Jungle Satyagraha was carried out successfully in Satana, Baglan and Kalvan Taluqas. The chief leaders in Baglan included Dadasaheb Gadre, Mahant Seetaramshastri and Tarkateertha Laxmanshastri Joshi. Dang is the area of forests. The Koli and Thakar tribes were also drawn into the Jungle Satyagraha. It became difficult for the government servants to collect the Forest Grazing Tax from them. They were not terrified even by the armed police. On 5th August, a Jungle Satyagraha was organised at Bhilwad in Baglan, wherein thousands of farmers participated. Already distressed by the world's Great Depression, farmers extended their support like never before to the programme of Satyagraha to break Salt Laws and Forest Laws.

---

**31.** श्री नवरे यांनी आपण सागराकडून पर्वताकडे जात असल्याचे जाहीर केले.
या वाक्याचा अर्थ काय होतो ?
(1) ते तीर्थयात्रेला जाणार होते.
(2) ते किनारपट्टीपासून डोंगराळ प्रदेशापर्यंत पद्यात्रा काढणार होते.
(3) सत्याग्रहाचे केंद्र आता समुद्राकडून डोंगराळ भागातील जंगलांकडे जाणार होते.
(4) वरीलपैकी एकपण नाही.

Mr. Navare declared that they were now moving from the sea to the mountains.
What does the statement mean ?
(1) He was going on a pilgrimage.
(2) He was undertaking a march on foot from the coastal areas to the mountains.
(3) The centre of Satyagraha was to shift from the sea to the mountain forests.
(4) None of the above.

---

**32.** जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | भिलवड | I. | जंगल सत्याग्रह समिती |
| ब. | डांग | II. | महंत सीतारामशास्त्री |
| क. | संगमनेर | III. | कोळी व ठाकर |
| ड. | बागलाण | IV. | हजारो शेतकऱ्याचा सहभाग |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | II | I | IV | III |
| (2) | IV | III | I | II |
| (3) | I | III | IV | II |
| (4) | IV | II | III | I |

Match the pairs :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | Bhilwad | I. | Jungle Satyagraha Samiti |
| b. | Dang | II. | Mahant Seetaramshastri |
| c. | Sangamner | III. | Koli and Thakar |
| d. | Baglan | IV. | Participation of thousands of farmers |

**Answer Options :**

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | II | I | IV | III |
| (2) | IV | III | I | II |
| (3) | I | III | IV | II |
| (4) | IV | II | III | I |

**33.** पुढील घटनांचा कालानुक्रम उताऱ्यातील माहितीनुसार मांडा.

अ. भिलवड सत्याग्रह

ब. मिठाचा सत्याग्रह

क. जंगल सत्याग्रह समितीचे कार्यालय संगमनेरमध्ये स्थापन.

ड. जंगल कायदे सर्वप्रथम अंमलात आले.

(1) ड, ब, क, अ (2) ड, अ, क, ब (3) अ, क, ड, ब (4) ड, क, अ, ब

Arrange the events chronologically according to the passage.

a. Satyagraha at Bhilwad

b. Salt Satyagraha

c. Opening of Jungle Satyagraha Samiti office at Sangamner.

d. Forest Laws were first implemented.

(1) d, b, c, a (2) d, a, c, b (3) a, c, d, b (4) d, c, a, b

---

**34.** पुढीलपैकी कोणते विधान योग्य ठरेल ?

(1) जंगल सत्याग्रहापेक्षा मिठाच्या सत्याग्रहात शेतकऱ्यांचा सहभाग अधिक होता.

(2) नाशिक व अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांनी मिठाच्या आणि जंगल सत्याग्रहात सहभाग घेतला.

(3) जागतिक महामंदीनंतर शेतकऱ्यांनी अभूतपूर्व पद्धतीने सत्याग्रह चळवळीत सहभाग घेतला.

(4) वरीलपैकी एकपण नाही.

Which of the following can be considered a correct statement ?

(1) More farmers participated in the Salt Satyagraha than the Jungle Satyagraha.

(2) Farmers from Nasik and Ahmednagar districts participated in the Salt and the Jungle Satyagraha.

(3) Farmers supported the Satyagraha movement in an unprecedented manner after the world's Great Depression.

(4) None of the above.

---

**35.** उताऱ्यामध्ये दिलेल्या माहितीवरून पुढीलपैकी कोणते विधान करता येणार ***नाही*** ?

(1) जंगल सत्याग्रह समितीचे मुख्य कार्यालय अहमदनगर जिल्ह्यात होते.

(2) लक्ष्मणशास्त्री जोशींनी जंगल सत्याग्रहात भाग घेतला व कारावास भोगला.

(3) आषाढी एकादशीच्या दिवशी कोळी व ठाकर जमातीच्या लोकांनी सत्याग्रहात सहभाग घेतला.

(4) चंदनपुरी, सावरगाव, भिलवड येथील सत्याग्रहांना हजारो लोकांचा पाठिंबा होता.

Which of the following statements can ***not*** be made based on the information in the passage ?

(1) The main office of Jungle Satyagraha Samiti was in Ahmednagar District.

(2) Laxmanshastri Joshi participated in the Jungle Satyagraha and was jailed for it.

(3) Koli and Thakar Tribal people participated in the Satyagraha on Ashadhi Ekadashi.

(4) Thousands of people supported the Satyagrahas at Chandanpuri, Savargaon and Bhilwad.

**पुढील उतारावाचून त्यावर आधारित 36 ते 40 प्रश्नांची उत्तरे द्या :**

## सती विरोधी कायदा 1987

**सतीचा गुन्हा करणाऱ्याला प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षा (कलम 4)**

(1) भारतीय दंडविधान 1860 मधे काहीही म्हटले असले तरी सुद्धा, एखादी व्यक्ती सती जात असेल तर जर कोणी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रीत्या अशा सतीला मदत केली, तर त्या व्यक्तिला मृत्यु दंड, अथवा जन्मठेप अशी शिक्षा होईल तसेच ती दंडास जबाबदार राहील.

(2) जर एखाद्या व्यक्तीने सती जाण्याचा प्रयत्न केला तर अशा प्रयत्नाला प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे सहाय्य करणाऱ्या व्यक्तीला जन्मठेपेची शिक्षा होईल तसेच ती दंडाम जबाबदार राहील.

या कलमाखाली पुढील कृत्ये केल्यास ती गुन्हयाला सहाय्य करणारी कृत्ये असेच धरले जाईल :

(a) एखाद्या स्त्री ला अथवा विधवेला तिच्या मृत पती बरोबर जीवंतपणी जळण्यास अथवा पुरुन घेण्यास, अथवा इतर नातेवाईका बरोबर, अथवा पती संबंधी एखादी गोष्ट अथवा वस्तू यासह तसे करण्यास प्रवृत्त करणे. येथे तिच्या स्वस्थ मानसिक स्थितिचा अथवा गुंगीच्या अंमलाखाली असलेली मानसिक स्थिती किंवा इतर काही कारणामुळे स्वतंत्रपणे निर्णय घेता न येणारी मानसिक स्थिती याचा काही संबंध नाही.

(b) एखाद्या स्त्रीमधे अथवा विधवेमधे असा विश्वास निर्माण करणे की तिच्या सती जाण्यामुळे तिला, अथवा तिच्या मृत पतीला अथवा एखाद्या नातेवाईकाला अध्यात्मिक लाभ होणार आहे अथवा तसे करणे हे कुटुंबाच्या स्वास्थ्यासाठी जरूरीचे आहे.

(c) एखाद्या विधवेला अथवा स्त्रीला तिच्या सती जाण्याच्या विचारा पासून न ढळण्याची प्रेरणा देणे व सती जाण्यास प्रोत्साहन देणे.

(d) सतीसंबंधीत मिरवणुकीत भाग घेणे अथवा एखाद्या विधवेला अथवा स्त्रीला सती जाण्याचा निर्णय घेण्यास मदत करणे आणि तिला तिच्या मृत पतीच्या कलेवरा सोबत अथवा नातेवाईका सोबत स्मशानात नेणे.

(e) सती जाण्याच्या जागेवर हजर रहाणे आणि त्या प्रक्रियेत अथवा त्या संबंधातील समारंभात सक्रिय सहभाग घेणे.

(f) एखाद्या विधवेला अथवा स्त्रीला, जी स्वत: ला जळीतापासून अथवा जिवंतपणी पुरले जाण्यापासून वाचविण्याचा प्रयत्न करत आहे, अडथळा निर्माण करणे अथवा तिला तशा प्रकारे स्वत:चा बचाव करण्यापासून रोखणे.

(g) सती जाण्याच्या घटनेला रोखण्यासाठी पोलीस प्रयत्न करत असतील, तर त्याना त्यांच्या कर्तव्यापासून पदच्युत करण्याचा प्रयत्न करणे अथवा त्यात अडथळा निर्माण करणे.

**सतीच्या उदात्तीकरणसाठी शिक्षा (कलम 5)**

या कायद्याच्या कलम 2(b) प्रमाणे, सतीचे उदात्तीकरण करणे या संज्ञेत इतर कृत्यां बरोबर पुढील कृत्यांचाही समावेश होतो. अशी सती हा कायदा पास होण्यापूर्वी अथवा नंतर केव्हाही झालेली असली तरी :

(i) सती संबंधी असलेल्या मिरवणुकीत सामील होणे अथवा त्यासंबंधी समारंभाला हजर रहाणे.

(ii) सती प्रथेचा कोणत्याही प्रकारे प्रचार करणे तिचे समर्थन करणे किंवा तिला दुजोरा देणे.

(iii) सती गेलेल्या व्यक्तिचा उदो उदो करण्यासाठी समारंभ आयोजित करणे.

(iv) सती गेलेल्या व्यक्तिच्या सन्मानार्थ अथवा तिची स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने, ठेव उभारणे, निधी गोळा करणे, अथवा सतीचे मंदीर बांधणे अथवा इतर कोणतेही बांधकाम उभारणे, जेथे सतीची पूजाअर्चा केली जाईल अथवा समारंभाचे आयोजन करणे.

**Read the following passage and answer the questions from 36 to 40 :**

## The Commission of Sati (Prevention) Act 1987

**Punishment for Abetment of Sati (Sec 4) :**

(1) Notwithstanding anything contained in The Indian Penal Code, 1860, if any person commits sati, whoever abets the commission of such sati, either directly or indirectly, shall be punishable with death or imprisonment for life and shall also be liable to fine.

(2) If any person attempts to commit sati, whoever abets such attempt either directly or indirectly, shall be punishable with imprisonment for life and shall also be liable to fine.

The following act shall also be deemed to be an abetment for the purpose of this Section :

(a) any inducement to a widow or woman to get her burnt or buried alive along with the body of her deceased husband or with any other relative or with any article, object or thing associated with the husband or with such relative, irrespective of whether she is in a fit state of mind or is labouring under a state of intoxication or stupefaction or other cause impeding the exercise of her free will;

(b) making a widow or woman believe that the commission of sati would result in some spiritual benefit to her deceased husband or relative or the general well-being of the family;

(c) encouraging a widow or a woman to remain fixed in her resolve to commit sati and thus instigating her to commit sati;

(d) participating in any procession in connection with the commission of sati or aiding the widow or woman in her decision to commit sati by taking her along with the body of her deceased husband or relative to the cremation or burial ground;

(e) being present at the place where sati committed as an active participant to such commission or to any ceremony connected with it;

(f) preventing or obstructing the widow or woman from saving herself from being burnt or buried alive;

(g) obstructing or interfering with, the Police in the discharge of its duties of taking any steps to prevent the commission of sati.

**Punishment for glorification of Sati (Sec. 5) :**

As per Section 2(b) of the Act, glorification in relation to sati; whether such sati was committed before or after the commencement of this Act, includes, among other things :

(i) the observance of any ceremony or the taking out of a procession in connection with the commission of sati; or

(ii) supporting, justifying or propagating the practice of sati in any manner; or

(iii) arranging of any function to eulogize the person who has committed sati; or

(iv) creation of a trust, or the collection of funds, or the construction of a temple or other structure or the carrying on of any form of worship or the performance of any ceremony there with a view to perpetuate the honour of, or to preserve the memory of a person who has committed sati.

**36.** सती जाण्याकरीता प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रीत्या मदत करणाऱ्या व्यक्तीला कोणत्या कायद्याखाली शिक्षा होईल ?

(1) भारतीय दंड विधान, 1860 (2) सती (प्रतिबंध) कायदा, 1987

(3) फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 (4) वरील पैकी सर्व

Under which Act, a person who abets, either directly or indirectly to commit sati, will be punished ?

(1) Indian Penal Code, 1860
(2) The Commission of Sati (Prevention) Act, 1987
(3) Criminal Procedure Code, 1973
(4) All of the above

---

**37.** खालीलपैकी कोणती कृत्ये सती प्रतिबंध कायदा 1987 च्या अंतर्गत शिक्षेस पात्र आहेत ?

अ. विधवेस सती जाण्यास प्रवृत्त करणे.
ब. विधवेला सती जाण्याचा निर्णय घेण्यास मदत करणे.
क. सतीच्या संबंधातील कोणत्याही मिरवणुकीत सामील होणे.
ड. जिवंतपणी जाळून घेण्याच्या कृत्यापासून स्वतःचा बचाव करू पहाणाऱ्या विधवेला तसे करण्यापासून रोखणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ फक्त (2) अ आणि ड (3) अ, ब आणि ड (4) वरील सर्व

Which of the following acts are punishable under the provisions of "The Commission of Sati (Prevention) Act 1987 ?

a. Instigating a widow to commit sati
b. Aiding the widow in her decision to commit sati
c. Participating in any procession in connection of sati.
d. Preventing the widow from saving herself from being burnt alive.

**Answer Options :**

(1) a only (2) a and d (3) a, b and d (4) All of the above

---

**38.** सती (प्रतिबंध) कायद्यानुसार पुढीलपैकी कोणती कृत्ये सती जाण्यास प्रोत्साहन देणारी अथवा सहाय्य करणारी समजली जातील ?

अ. सती जाणाऱ्या व्यक्तिला रोखण्याचा प्रयत्न करणाऱ्या पोलीसांच्या कृत्याला अडथळा आणणे.
ब. सती जात असलेल्या घटनास्थळी उपस्थित राहून सक्रिय सहभाग घेणे.
क. सती गेल्यास मृत पतीला आध्यात्मिक फायदा होईल यावर त्या विधवेला विश्वास ठेवायला भाग पाडणे.
ड. सती जाण्याचा विचार विधवेने बदलू नये म्हणून तिला प्रेरणा देणे. (प्रोत्साहन)

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ फक्त (2) क आणि ड (3) वरीलपैकी सर्व (4) वरीलपैकी कोणतेही नाही

Under the provisions of The Commission of Sati (Prevention) Act, which of the following acts shall be deemed to be an abetment of sati ?

a. obstructing the Police, taking any steps to prevent the commission of sati.
b. being present at the place where sati is committed as an active participant.
c. making a widow believe that her commission of sati will give spiritual benefit to her deceased husband.
d. encouraging a widow to remain fixed in her resolve to commit sati.

**Answer Options :**

(1) a only (2) c and d (3) All of the above (4) None of the above

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**39.** सती प्रतिबंध कायदा 1987 च्या अंतर्गत कोणत्या कलमान्वये "सतीचे उदात्तीकरण करणे" याला शिक्षा सांगितली आहे ?

(1) कलम 2(b)

(2) कलम 5

(3) कलम 4

(4) वरीलपैकी एकपण नाही

Under which of the Section of The Commission of Sati (Prevention) Act 1987, is punishment for glorification of sati prescribed ?

(1) Section 2(b)

(2) Section 5

(3) Section 4

(4) None of the above

---

**40.** सती (प्रतिबंध) कायदा, 1987 च्या संदर्भात पुढील विधानांवर विचार करा.

अ. सती गेलेल्या व्यक्तीची स्तुती/प्रशंसा करण्यासाठी एखाद्या समारंभाचे आयोजन करणे म्हणजे सती प्रथेचे उदात्तीकरण नाही.

ब. सती गेलेल्या व्यक्तीच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देश्याने त्या व्यक्तीचे मंदीर बांधणे म्हणजे सती प्रथेचे उदात्तीकरण आहे.

(1) 'अ' आणि 'ब' दोन्ही चूक

(2) 'अ' आणि 'ब' दोन्ही बरोबर

(3) 'अ' चूक आणि 'ब' बरोबर

(4) 'अ' बरोबर आणि 'ब' चूक

Think about the following statements in relation to The Commission of Sati (Prevention) Act, 1987.

a. Arranging of any function to eulogize the person who has committed sati is not a glorification of sati system.

b. Constitution of temple in order to preserve the memory of a person who has committed sati is a glorification of sati system.

(1) Both 'a' and 'b' are wrong

(2) Both 'a' and 'b' are correct

(3) 'a' is wrong and 'b' is correct

(4) 'a' is correct and 'b' is wrong

**पुढील उतारावाचून त्यावर आधारित 41 ते 45 प्रश्नांची उत्तरे द्या :**

प्राचीन भारतीय ग्रंथात आदिवासींचा उल्लेख अरण्यात राहणारे म्हणून 'अरण्यक' असा केला आहे. इथले हे मूळ निवासी, दुर्गम अशा पहाडी प्रदेशात राहतात म्हणून त्यांचा उल्लेख गिरिजन, वनवासी असाही केला जातो. भारतात अशा सुमारे 400 आदिवासी जमातींची नोंद आहे. रानातली कंदमुळं आणि जंगलातल्या आपल्या वाटेला आलेल्या जमिनीवर ते आपली उपजीविका करतात. याशिवाय त्यांना उपजीविकेसाठी दुसरं साधन नाही. दऱ्याखोऱ्यात वस्ती करून राहणाऱ्या या आदिवासींची संस्कृती नागर संस्कृतीपेक्षा वेगळी आहे. त्यांच्या आजूबाजूला निसर्ग आहे. त्यामुळे ते निसर्गपूजक आहेत. श्रद्धाळू आहेत आणि अंधश्रद्धही आहेत. देव, भगत, जादूटोणा यांचा पगडा त्यांच्यावर आहे. निसर्गावर निरतिशय प्रेम करणाऱ्या आदिवासींमध्ये वर्णभेद नाही. उच्चनीच नाही. जंगलाचा राजा संबोधणारा हा समाज निःस्वार्थीपणा, प्रामाणिकपणा या मूल्यांची जपणूक करत प्रतिकूल परिस्थितीतही आपली संस्कृती टिकवून आहे. आदिवासी बोलीभाषा, वेषभूषा, आचार-विचार, जीवन व्यवहार, चालीरिती हीच त्यांची संस्कृती. त्यांचे सण-उत्सव, देवदेवतांचे पूजाविधी, जन्म-मरण विधी यातून त्यांच्या जीवन व्यवहारांची ओळख होते. पिढ्यान्‌पिढ्या अस्तित्वात असलेली आपली संस्कृती त्यांनी जपली आहे हे विशेष होय. बोहडासारखा उत्सव, तारपा नृत्य जागतिक स्तरावर पोचलेली वारली चित्रकला आदीतून अभिव्यक्त होणारी त्यांची जीवनशैली भारतीय लोकसंस्कृतीचे वैभव आहे.

आदिवासी साहित्याचे अभ्यासक डॉ. गोविंद गारे यांनी अनेक वर्षे आदिवासींवर संशोधन केले. त्यांनी म्हटले आहे की, "पृथ्वीवर जेव्हा कुठलीच संस्कृती उदयाला आली नव्हती तेव्हा आदिवासी संस्कृती सुखाने नांदत होती. आर्यांच्या आगमनाने या संस्कृतीला तडा गेला." यूरोप, मध्य आशियातून खैबर खिंडीमार्गे आलेल्या आर्यांनी भारतावर आक्रमण करून इथे राहणाऱ्या आदिवासींवर हल्ला करून त्यांच्या जमिनी हिसकावून घेतल्या आणि त्यांना हाकलून लावले. आपल्या जमिनी गमावलेले इथले मूळ निवासी जीव वाचवून जंगलात आश्रयाला गेले. निसर्गाच्या सान्निध्यात डोंगर-दऱ्यात राहू लागले. त्यांची जीवनशैली बदलली. खरे तर मूळ जमिनीचे ते मालक पण त्यांच्या नशिबी असा वनवास आला. पण आहे त्या परिस्थितीशीही तडजोड करून ते जंगलात राहू लागले. या आदिवासींना 'आदिम' असेही म्हटले जाते.

या आदिवासी समाजाची एक भाषा नाही. हे आदिवासी अनेक समाजगटात विखुरले आहेत. या प्रत्येक समाजाची बोली भाषा वेगळी आहे. या भाषांना लिपी नाही. ही एक मोठी अडचण आहे. एकट्या महाराष्ट्राचाच विचार केला तर एकूण लोकसंख्येच्या 9·5 टक्के आदिवासी महाराष्ट्रात आहेत. कोरकू, वारली, ठाकर, कोकणा, गोंड, माडिया, काथोडी, महादेव कोळी, परधार, मथवाडी, भिल्ल, कातकरी अशा अनेक आदिवासी जमातींची नावे डोळ्यापुढे येतात. बाह्य जगाशी फारसा संबंध न येणारे हे आदिबासी एकविसाव्या शतकातही डोंगर दऱ्यातच वास्तव्य करत आहेत.

**41.** कोणत्या आदिवासींना 'आदिम' म्हटले जाते ?

अ. अरण्यात राहणारे

ब. निसर्गाच्या सान्निध्यात डोंगरदऱ्यात राहणारे

क. जंगल व निसर्गापासून दूर असलेले

ड. ज्यांची संस्कृती शहरीकरणाच्या जवळची आहे

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त ब आणि क (2) फक्त अ आणि ड

(3) फक्त ब आणि क (4) फक्त अ आणि ब

---

**42.** आदिवासींची जीवनशैली भारतीय लोकसंस्कृतीचे वैभव ठरण्याचे कारण कोणते ?

अ. आदिवासी लोककलांना जागतिक स्तरावर मिळालेली अमान्यता.

ब. पिढ्यान्‌पिढया अस्तित्वात असलेल्या आपल्या संस्कृतीची जपणूक.

क. प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या मूल्याधारित संस्कृतीच्या राखळेळ सार्थ अभिमान.

ड. निसर्गाच्या सानिध्यात राहूनही त्यांच्यातील वर्णभेद उच्चनीचतेची भावना गळून न पडणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ आणि ब (2) फक्त ब आणि क

(3) फक्त ड आणि क (4) फक्त अ आणि ड

---

**43.** अरण्यक, गिरीजन, वनवासी, आदिम यातील शब्दश: समान अर्थ असणारे शब्द कोणते ?

अ. अरण्यक – आदिम ब. वनवासी – गिरीजन

क. अरण्यक – वनवासी ड. वनवासी – आदिम

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ आणि क (2) फक्त ड (3) फक्त क (4) फक्त ब

---

**44.** आदिवासींचे पुरोगामित्व सूचित करणारी वाक्ये कोणती ?

अ. आदिवासी बोलीभाषा, वेषभूषा, आचार विचार, जीवन व्यवहार, चालीरीती हीच त्यांचा संस्कृती.

ब. निसर्गावर निरतिशय प्रेम करणारे आदिवासी वर्णभेद, उच्चनीचता मानत नाहीत.

क. देव-भगत-जादूटोणा यांचा त्यांच्यावर पगडा असल्याने ते अत्यंत श्रद्धाळू असतात.

ड. नि:स्वार्थीपणा, प्रामाणिकपणा या मूल्यांची जपणूक करीत आपली संस्कृती ते हरवून बसले.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त ब (2) फक्त अ आणि ड

(3) फक्त ब आणि क (4) फक्त अ आणि ब

---

**45.** आदिवासींच्या भाषांना लिपी नसण्याचे कारण कोणते ?

अ. त्यांना फक्त निसर्गच वाचना येत होता.

ब. डोंगरदऱ्या हेच त्यांचे विश्व होते.

क. विखुरलेल्या समाज गटांमुळे त्यांना आपल्या भाषेचे स्वतंत्र स्थान टिकवता आले.

ड. अंधश्रद्धेचा पगडा असल्याने त्यांनी कोणतीच लिपी अवगत केला नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ आणि ड (2) फक्त क आणि ड

(3) फक्त क (4) फक्त ड

---

**Read the given passage carefully and answer the Questions No. 46 to 50 on the basis of the contents of the passage :**

Language is transmitted culturally; that is, it is learned. To a lesser extent it is taught, when parents, for example, deliberately encourage their children to talk and to respond to talk, correct their mistakes, and enlarge their vocabulary. But it must be emphasized that children very largely acquire their first language by "grammar construction" from exposure to a random collection of utterances that they encounter. What is classed as language teaching in school either relates to second-language acquisition or, insofar as it concerns the pupils' first language, is in the main directed at reading and writing, the study of literature, formal grammar, and alleged standards of correctness, which may not be those of all the pupils' regional or social dialects. All of what goes under the title of language teaching at school presupposes and relies on the prior knowledge of a first language in its basic vocabulary and essential structure, acquired before school age.

If language is transmitted as part of culture, it is no less true that culture as a whole is transmitted very largely through language, insofar as it is explicitly taught. The fact that humankind has a history in the sense that animals do not is entirely the result of language. So far as researchers can tell, animals learn through spontaneous imitation or through imitation taught by other animals. This does not exclude the performance of quite complex and substantial pieces of acculturation, but the importance of the linguistic manifestations of social status and of social hierarchies is not lost on aspirants for personal advancement in stratified societies. The deliberate cultivation of an appropriate dialect, in its lexical, grammatical, and phonological features, has been the self-imposed task of many persons wishing "to better themselves" and the butt of unkind ridicule on the part of persons already feeling themselves secure in their social status or unwilling to attempt any change in it. Much of the comedy in George Bernard Shaw's *Pygmalion* (first performed in 1913, with subsequent film adaptations) turns on Eliza Doolittle's need to unlearn her native Cockney if she is to rise in the social scale. Culturally and subculturally determined taboos play a part in all this, and persons desirous of moving up or down in the social scale have to learn what words to use and what words to avoid if they are to be accepted and to "belong" in their new position.

The same considerations apply to changing one's language as to changing one's dialect. Language changing is harder for the individual and is generally a rarer occurrence, but it is likely to be widespread in any mass immigration movement. In the $19^{th}$ and early $20^{th}$ centuries, the eagerness with which immigrants and the children of immigrants from continental Europe living in the United States learned and insisted on speaking English is an illustration of their realization that English was the linguistic badge of full membership in their new homeland at the time when the country was proud to consider itself the melting pot in which people of diverse linguistic and cultural origins would become citizens of a unified community. A reverse movement, typically by third-generation immigrants, manifests a concern to be in contact again with the ancestral language.

**46.** Choose the best option/s :
Children largely acquire their first language ________
a. by learning words.
b. in the classroom.
c. because of their parents' encouragement.
d. through the exposure they get to different language utterances.

**Answer Options :**
(1) a and b (2) c and d (3) d (4) b

---

**47.** Choose the correct options :
People in the higher society laughed at ________
(1) people who do not want any change in their language.
(2) people who try to better themselves by appropriating their language in its phonological, grammatical and vocabulary features.
(3) people who feel secured in their social status.
(4) None of the above

---

**48.** Choose the correct option/s :
Eliza Doolittle's example is given to explain ________
a. the meaning of taboos.
b. how comedy is woven around her.
c. how language plays an important role in moving up and down in the social scale.
d. how good language is necessary to be accepted in higher society.

**Answer Options :**
(1) a and c (2) b and c (3) b and a (4) c and d

---

**49.** Match the following :

| | *A* | | *B* |
|---|---|---|---|
| a. | Cockney | I. | Prohibited words |
| b. | Acculturation | II. | Clearly seen |
| c. | Hierarchies | III. | Dialect |
| d. | Taboos | IV. | System of levels |
| e. | Manifestation | V | Mixing of cultures |

**Answer Options :**

| | **a** | **b** | **c** | **d** | **e** |
|---|---|---|---|---|---|
| (1) | III | V | IV | I | II |
| (2) | I | II | IV | V | III |
| (3) | IV | V | III | II | I |
| (4) | II | III | V | I | II |

---

**50.** Which of the given statements are true in the context of the passage ?
a. Animals learn through imitation but not human beings.
b. Language does not reflect culture.
c. We have history because of language only.
d. People learn standard language in the hope that they can go up in the social scale.
e. Immigrants in U.S. did not learn English.
f. Third generation immigrants want to be in touch with their forefather's language.

**Answer Options :**
(1) c, d and f (2) b, c and d (3) a, d and e (4) e, d and e

**51.** रेलगाड्यांसाठी कोकणात फक्त एकेरी मार्ग उपलब्ध आहे. ताशी 50 किमी (प्रति तास) इतक्या एकसमान गतीने प्रवास करणाऱ्या गाडीने 'Ax' हे स्थानक 100 किमीवर असलेल्या 'By' या स्थानकावर पोहोचण्यासाठी सकाळी 7.40 ला सोडले. ताशी 40 किमी (प्रति तास) या एकसमान गतीने प्रवास करणाऱ्या गाडीने 'By' हे स्थानक 'Ax' या स्थानकावर पोहोचण्यासाठी सकाळी 8.10 ला सोडले. वाहतूक नियंत्रकाच्या ही परिस्थिती सकाळी 8.40 ला लक्षात आली या दोन गाड्यांची टक्कर टाळण्या दृष्टीने निर्णय घेण्यासाठी नियंत्रकाला गणिती हिशेबाने उपलब्ध असलेला कालावधी निवडा.

(1) 20 मिनिटे (2) 19 मिनिटे (3) 21 मिनिटे (4) 15 मिनिटे

Only a single railway track is available for trains in Konkan area. A train travelling with uniform speed of 50 km per hr. leaves station 'Ax' at 7.40 am to reach the station 'By', which is situated at a distance of 100 km from 'Ax'. At 8.10 am a train travelling with uniform speed of 40 km per hr. leaves station 'By' to reach the station 'Ax'. The Traffic Controller noticed this situation at 8.40 am. Select the time duration that the controller has mathematically, for making decision, for avoiding collision between these two trains.

(1) 20 minutes (2) 19 minutes (3) 21 minutes (4) 15 minutes

---

**52.** जया म्हणते, "मी जर माझ्या आजपासून 6 वर्षांनी होणाऱ्या वयाची 6 पट माझ्या 7 वर्षांनी होणाऱ्या वयाच्या 7 पटीत मिळवली तर माझ्या आताच्या वयाची 14 पट मिळते. तर आतापासून 5 वर्षांनी होणारे माझे वय दाखवणारा पर्याय निवडा."

(1) 85 वर्षे (2) 80 वर्षे

(3) 95 वर्षे (4) 90 वर्षे

Jaya says, "When I add 6 times my age 6 years from now to 7 times my age 7 years from now, I get 14 times my current age. Select the option that indicates my age, after 5 years from now."

(1) 85 years (2) 80 years

(3) 95 years (4) 90 years

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK


**53.** A, B, C, D, K, L, M व O हे संशोधक X, Y व Z या तीन वेगवेगळ्या संस्थांगत काम करतात. ते सौर ऊर्जा, शाश्वत विकास व शेतीच्या कामासाठी जलसुगी या तीन क्षेत्रांत ते काम करतात. कोणत्याही एका क्षेत्रात दोनपेक्षा कमी वा तीनपेक्षा जास्त व्यक्ती काम करत नाहीत आणि एका संस्थेत त्यांच्यापैकी तिघांपेक्षा जास्त व्यक्ती काम करत नाहीत. K हा जलसुगीत संशोधन करणाऱ्या B बरोबर शाश्वत विकासात Y या संस्थेत संशोधन करतो. A व M हे समान क्षेत्रात काम करतात पण शाश्वत विकासात नव्हे आणि Y या संस्थेत काम करत नाहीत. C हा संशोधक Z या संस्थेत, सौरऊर्जेत, फक्त D शाश्वत विकासात संशोधन करणाऱ्याबरोबर काम करतो. L हा जलसुगीत संशोधन करतो आणि A काम करतो त्या संस्थेत काम करत नाही. O हा सौरऊर्जा क्षेत्रात काम करत नाही. "कोणत्या संस्थेत/संस्थांत किमान एकतरी संशोधक सौरऊर्जा क्षेत्रात काम करतो?" याचे उत्तर देण्यासाठी पर्याय निवडा.

(1) Z वगळता सर्व (2) Z व X दोन्ही
(3) Y व X दोन्ही (4) फक्त X

A, B, C, D, K, L, M and O are researchers and are working in three different institutes, X, Y and Z. They are working in three different areas namely, solar energy, sustainable development, and rainwater harvesting for agricultural purpose. Not less than two or more than three researchers are working in the same area and not more than three of them are working the same institute. K is researching in the sustainable development in the institute Y with B who is doing research in rainwater harvesting. A and M are doing research in the same area but not in sustainable development and are not working in the institute Y. C is researching in solar energy in the institute Z only, with D who is working in sustainable development. L is researching in rainwater harvesting area and not working in the institute where A works. O is not doing research in the solar energy.
Choose option for answering question, "In which of the institute/institutes at least one researcher is working in the area of solar energy ?


(1) All expect Z (2) Both Z and X
(3) Both Y and X (4) Only X

**54.** सोबतच्या आकृतीत A, B, C, D व E या वसाहतींना जोडणाऱ्या रस्त्यांचा नकाशा दाखविलेला आहे. तुमच्या निवडीच्या कोणत्याही वसाहतीपासून सुरुवात करून सातहीमार्गांवरून एकदा आणि फक्त एकदाच चालावे लागेल अशा मार्गांची रचना करा. जेथून सुरूवात केली तेथेच शेवट व्हावा, ही अपेक्षा नाही. अशा मार्गाची सुरूवात किती ठिकाणांवरुन करता येईल ?





(1) एकही नाही (2) एक (3) दोन (4) तीन

A road map connecting to the colonies A, B, C, D and E is shown in the figure below. Design the route starting from any colony of your choice so that you will have to walk on each of the seven routes once and only once. The starting point and the end point may not be the same. From how many points, can such route be started ?





(1) None (2) One (3) Two (4) Three


**55.** प्रतिमांच्या चौकटी काळजीवपूर्वक अभ्यासा आणि प्रश्नचिन्हाच्या जागी ठेवण्यासाठी सर्वात उचित पर्याय निवडा




(1)     (2)     (3)     (4) 

Study the boxes of images carefully and choose appropriate option to replace the question mark.




(1)     (2)     (3)     (4) 

---

